महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ व प्राधिकरण
दुय्यम सेवा निवड मंडळ [illegible] नियमात
बदलीची तरतूद नसलेल्या [illegible] पदांवरील बदलीने
करावयाच्या नेमणुकांना [illegible]

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:प्रानिमं• १२९०/प्र.क्र. ५७/९०/१३-अ,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक :- १० फेब्रुवारी, १९९०.

वाचा :-१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-प्रानिमं•
१२८६/प्र.क्र.८६/[१]/१३-अ, दि. ९ फेब्रुवारी, १९८८.
२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एससी-
१०८२/१४-अ, दि. २१एप्रिल, १९८२.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-
१०८७/सीआर.४९/१६-अ, दि. १४मार्च, १९८८.

प रि प त्र क

दिनांक ९ फेब्रुवारी, १९८८च्या शासन निर्णयातील परिशिष्ट "क"मधील "[ई]
[३]"अनुसार सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार बदलीने करावयाच्या नेमणूका निवड मंडळाच्या कक्षेत येत नाहीत. वर उल्लेखिलेल्या शासन परिपत्रक, दिनांक २१एप्रिल, १९८२ व शासन निर्णय, दिनांक १४मार्च, १९८८अन्वये काही विशिष्ट परिस्थितीत बदली करण्यास अनुमती देण्यासंबंधीचे आदेश शासनाने निर्गमित केले आहेत.

२. ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदलीने नेमणूका करण्याची तरतूद नाही, अशा पदांवरील बदलीने करावयाच्या नेमणुका सरळ-सेवा प्रवेशाने केलेल्या नेमणुका मानल्या लागतात. म्हणून त्या निवड मंडळाच्या कक्षेत येतात. अशा नेमणुकाला निवड मंडळे जोपर्यन्त मान्यता देत नाहीत तोपर्यन्त, अशाप्रकारे केलेल्या नेमणुका, नियमानुसार मानता येणार नाहीत. शासनाच्या असे निदर्शनास आले की, सेवा प्रवेश नियमात तरतूद नसताना नेमणूक प्राधिकारी सर्वसाधारणपणे एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या बदल्या करतात. वर नमूद केलेल्या परिस्थितीत त्यांची ही कार्यवाही नियमबाह्य ठरते. यास्तव उक्त दिनांक २१एप्रिल, १९८२ व दिनांक १४मार्च, १९८८च्या आदेशानुसार विशिष्ट परिस्थितीत बदलीने करावयाच्या नेमणुकांना संमती देण्याचे अधिकार निवडमंडळांना प्रदान करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबतीत साकल्याने विचार करून शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

[१] ज्या कार्यालयाकडे, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एससी-१०८२/चौदा-अ, दिनांक २१एप्रिल, १९८२ व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही• १०८७/सीआर-४९/१६-अ, दि. १४मार्च, १९८८च्या आदेशानुसार बदलीने नेमणूक करण्यात येणार आहे व ज्या कार्यालयातून कर्मचाऱ्यांची बदली करण्यात येणार आहे, अशा [illegible] कार्यालयांनी दिनांक २१एप्रिल, १९८२ व दिनांक १४मार्च, १९८८च्या उक्त परिपत्रका

परिपत्रकातील आदेशामध्ये नमूद केलेल्या विशेष बाबींची परिपूर्ण तपासणी करावी व बदली करण्यासाठी विनंती करणाऱ्या कर्मचाऱ्याला खरोखरच बदली देणे आवश्यक आहे, किंवा कसे याची खात्री करून घ्यावी. अशा तपासणीअंती ज्या प्रकरणांमध्ये खरोखरच बदली करण्यासारखी परिस्थिती आहे असे संबंधित कार्यालयप्रमुखाचे मत निश्चित झाले तरच बदलीने करावयाच्या नेमणूकीचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सादर करण्यात यावा. कार्यालय प्रमुखांनी असे प्रस्ताव अगदी अपवादात्मक परिस्थितीतीच विचारात घ्यावेत.

[२] ज्या कार्यालयात व ज्या संवर्गातील पदावर बदली करण्यात येणार आहे त्या कार्यालयाने त्या संवर्गातील रिक्त पद भरण्यासाठी निवड मंडळाकडे मागणीपत्र पाठविले असले तर बदलीने नेमणूक करण्याचा प्रस्ताव त्या कार्यालयात त्यानंतर नव्याने पद रिक्त होईपर्यन्त प्रलंबित ठेवावा, परंतु कोणत्याही परिस्थितीत निवड मंडळाकडे पाठविलेल्या मागणीपत्रामध्ये नमूद केलेल्या रिक्त पदावर बदलीने नेमणूक करण्याचा प्रस्ताव निवड मंडळाकडे संमतीसाठी पाठवू नये.

[३] ज्या कार्यालयातील पदावर बदलीने नेमणूक करण्याचा प्रस्ताव असेल त्या कार्यालयाने बदलीने नेमणूक करण्यासाठी रिक्त पद उपलब्ध असल्यास, ते पद ज्या निवड मंडळाच्या कार्यकक्षेत येत असेल त्या निवड मंडळाकडे संमतीसाठी प्रस्ताव पाठवावा. प्रस्ताव पाठवितांना ज्या पदावर बदलीने नेमणूक करण्यात येणार आहे, त्या पदाचे सेवाप्रवेश नियम व बदलीने नेमणूक करावयाच्या कर्मचाऱ्याचा संपूर्ण तपशील पाठवावा.

[४] निवड मंडळाने असा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर, त्या प्रस्तावावर संबंधित कर्मचारी हा ज्या पदावर नेमण्यात येणार आहे, त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार नेमणूकीस पात्र आहे किंवा नाही इत्यादी बाबी तपासून निर्णय घ्यावा. निवड मंडळाने आपला निर्णय उपयुक्त कार्यालयास विनाविलंब कळवावा.

[५] निवड मंडळाने बदलीने नेमणूक करावयाच्या प्रस्तावास संमती दिल्यानंतर संबंधित कार्यालयाने तो कर्मचारी ज्या कार्यालयात काम करीत असेल त्या कार्यालयाला निवड मंडळाची संमती मिळाल्याचे कळवावे व सोबत निवड मंडळाच्या संमती पत्राची प्रत जोडावी. याप्रमाणे प्रस्तावास संमती प्राप्त झाल्यानंतर त्या कार्यालयाने संबंधित कर्मचाऱ्याचे बदलीचे आदेश काढावेत. बदलीच्या आदेशाची प्रत सर्व संबंधित कार्यालयांना तसेच निवड मंडळांना पृष्ठांकित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

लाट ना. वागुल,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

.3.